- **Token ID : TAL/RDDE/LANJ/2026/17**
  **District : Ratnagiri**

  **Status : Submitted**

  **Date : 08/09/2026 05:13 PM**

**Department :-** Rural Development

**Office :-** Block Development Officer,Lanja Office

**Officer Desk :-** Block Development Officer,Lanja

**Office Contact :-** 2351230027

**Office Email :-** bdopslanja@gmail.com

**Uploaded Document :-**

**Grievance Detail**

प्रति,
मा. गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, लांजा,
जि. रत्नागिरी.

विषय : हर्दखळे ग्रामपंचायतीतील सन 2015 ते 2020 या कालावधीतील माजी सरपंच तसेच त्यानंतरच्या प्रशासकांच्या कार्यकाळातील विकासकामे, आर्थिक व्यवहार व प्रशासकीय कामकाजाची चौकशी करण्याबाबत.

महोदय,

हर्दखळे ग्रामपंचायतीमध्ये सन 2015 ते 2020 या कालावधीत कार्यरत माजी सरपंच तसेच त्यानंतर ग्रामपंचायतीवर नियुक्त झालेल्या प्रशासकांच्या कार्यकाळातील विकासकामे, शासकीय व ग्रामपंचायत निधीचा वापर, खरेदी व्यवहार, ग्रामसभा/ग्रामपंचायत ठराव आणि प्रशासकीय निर्णय यांची सखोल तपासणी होणे आवश्यक आहे.

त्यामुळे खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी—

1. सन 2015 ते 2020 या कालावधीतील माजी सरपंचांच्या कार्यकाळाची सखोल चौकशी करण्यात यावी.

2. त्यानंतरच्या प्रशासकांच्या कार्यकाळातील सर्व आर्थिक व प्रशासकीय व्यवहारांची स्वतंत्रपणे तपासणी करण्यात यावी.
3. संबंधित कालावधीतील सर्व विकासकामे, मंजूर निधी, प्रत्यक्ष खर्च आणि प्रत्यक्ष कामाची पाहणी करून ताळमेळ तपासण्यात यावा.
4. अंदाजपत्रक, प्रशासकीय/तांत्रिक मान्यता, वर्क ऑर्डर, निविदा, MB, बिले, व्हाउचर, पूर्णत्व प्रमाणपत्र व संबंधित ठराव तपासण्यात यावेत.
5. निधीचा गैरवापर किंवा कामामध्ये अनियमितता आढळल्यास जबाबदार व्यक्ती निश्चित करण्यात यावी.
6. माजी सरपंच तसेच संबंधित माजी प्रशासकांना BDO कार्यालयात चौकशीसाठी ठरावीक दिनांक व वेळेस उपस्थित राहण्याबाबत लेखी नोटीस देण्यात यावी व त्यांचे म्हणणे नोंदविण्यात यावे.
7. तत्कालीन ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी, कर्मचारी, पदाधिकारी व संबंधित कंत्राटदारांचेही आवश्यकतेनुसार जबाब नोंदविण्यात यावेत.
8. चौकशीत दोष आढळल्यास संबंधितांविरुद्ध नियमानुसार प्रशासकीय व कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी.
9. चौकशीचा अंतिम अहवाल व करण्यात आलेल्या कार्यवाहीची लेखी माहिती अर्जदारास देण्यात यावी.

सदर प्रकरण सार्वजनिक निधी व ग्रामस्थांच्या हिताशी संबंधित असल्याने माजी सरपंच व प्रशासक या दोन्ही कालावधींची निष्पक्ष व सखोल चौकशी करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
किरण दत्ताराम चव्हाण
रा. हर्दखळे, ता. लांजा, जि. रत्नागिरी.

दिनांक : 08/09/2026

-